**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५६९/२०२२**
**सरकार विरुध्द सुनिल जानराव निताळे**
निशाणी क्र. १० लगत

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ याची शपथेवर साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करतो की,
माझे नाव – अनूप गणेशराव खंडारे,
वय – २७ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी,
राहणार – ६४ जीन प्लॉट, बनोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**<u>सरतपास अभियोग पक्षाकरीता सहा.सरकारी अभियोक्ता श्री. जी. बी. पाटील यांच्यामार्फत -</u>**

०१. आरोपीस मी ओळखत नाही. दिनांक २०.०९.२०२० रोजी दर्यापूर पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला बोलाविले होते. तिथे त्यांनी माझी सही घेतली होती. त्यांनी मला पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले नव्हते. त्यांनी माझ्यासमक्ष काहीही कारवाई केली नाही. पंचनामा आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावरील पंचाच्या सहीला **<u>निशाणी क्र.१४</u>** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले नव्हते.

**साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्याने वि.सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी त्याला उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी दर्यापूर पोलीसांनी मला गांधी चौक, बनोसा येथे घटनास्थळ/ जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिथे आरोपी अवैधपणे दारू विक्री करतांना मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्यांची झडती घेतली असता त्याच्या जवळील नायलॉन थैलीत देशी दारू बॉबी कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या २४ बाटल्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्या जप्त करून त्याचा माझ्यासमक्ष पंचनामा केला, तो मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी जप्त मुद्देमालापैकी एक बाटली रासायनिक तपासणी कामी माझ्यासमक्ष वेगळी काढली. हे

म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०९.२०२० रोजी पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आता मला बयानातील रेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. परंतू तो त्यात का आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी. एन. पर्वतकर यांच्यामार्फत-**

उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत,

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.06.25 16:45:43 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक-२५.०६.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर.